## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, रहाटणी, पुणे – १७

ड प्रभाग समिती,

कार्यपत्रिका क्र. ७

सभावृत्तांत

दिनांक ०२/०२/२०१८ दुपारी १२.०० वा.

पिपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग समितीची माहे फेब्रुवारी २०१८ ची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०२/०२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वा. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या "छत्रपती शाहू महाराज सभागृह" येथे आयोजीत करण्यात आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. श्री. कदम शशिकांत गणपत | सभापती |
| २) | मा. श्रीमती वाघमारे अश्विनी विक्रम | सदस्या |
| ३) | मा. श्रीमती दर्शले रेखा राजेश | सदस्या |
| ४) | मा. श्रीमती ममता विनायक गायकवाड | सदस्या |
| ५) | मा. श्री. कामठे तुषार गजानन | सदस्य |
| ६) | मा. श्रीमती चोंधे आरती सुरेश | सदस्या |
| ७) | मा. श्री. कस्पटे संदीप अरुण | सदस्य |
| ८) | मा.श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती कुटे निर्मला संजय | सदस्या |
| १०) | मा.श्री. सागर सुनिल आंगोळकर | सदस्य |
| ११) | मा. श्रीमती मुंढे उषा अंकुश | सदस्या |
| १२) | मा. श्रीमती लोखंडे चंदा राजू | सदस्या |

-----------------

या शिवाय, मा.श्रीमती स्मिता झगडे, क्षेत्रीय अधिकारी, मा.सिताराम बहुरे, प्रशासन अधिकारी तथा सचिव सभा शाखा, मा. प्रमोद ओंभासे, कार्यकारी अभियंता, स्थापत्य, मा. संदेश चव्हाण, कार्यकारी अभियंता विद्युत, मा. संदेश खडतरे, उपअभियंता, बीआरटीएस, मा. माधव सोनवणे, उपअभियंता, विद्युत, मा. सुर्यकांत मोहिते, उपअभियंता, जलनि:सारण, मा. लेखाधिकारी श्री. अशोक बोनगीर, मा. एच.आर. सरवदे, कार्यालय अधिक्षक, अतिक्रमण, मा. पाटील एस. वाय.,मा.संध्या वाघ, उपअभियंता, स्थापत्य, मा. भाऊसाहेब साबळे, उपअभियंता, पाणीपुरवठा, मा. कुतवळ एस.यु, मा. अमिन दिक्षीत, मा. साकेत पावरा, कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा, मा.

मुलाणी बी.एम., ढोले बी.आर., कनिष्ठ अभियंता, जलनि:सारण, मा. भालेराव यु.ए., मा. महेश कावळे, कनिष्ठ अभियंता विद्युत, मा. खोत एस.एच. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, मा. गेंगजे विश्वास, क्रीडा निरीक्षक, मा. सी.सी. मोरे, हॉर्टीकल्चर सुपरवायझर, मा. जे.व्ही.पटेल, उद्यान निरीक्षक, मा.दुदुसकर एस.एस.,मा. जी.एन. खैरे, उद्यान सहाय्यक, मा. एम.पी. सुभेदार, इ. अधिकारी उपस्थित होते.

-----------

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : माहे फेब्रुवारी २०१८ च्या नियमित ड प्रभाग समिती सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा.सभापती** : आजच्या सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

**मा. सचिव, सभा शाखा** :- सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेकामी मान्यता मिळावी.

**मा. सभापती** :– सन्मा. सदस्यांनी सादर केलेले ऐन वेळचे विषय दाखल करुन घेणेत येणेकामी मान्यता आहे.

**सन्मा. सदस्यांच्या मागणीप्रमाणे व मा. सभापती यांचे मान्यतेने सभेमध्ये खालील प्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१**: मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ८३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून दक्षिण बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्ट्यातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ८३,८८ व १३९ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा प्रस्ताव

**विषय क्र.** २ : मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ७३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून उत्तर बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्ट्यातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ७३व ७२ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेचा प्रस्ताव

**विषय क्र.** ३ : प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथे कुणाल आयकॉन रस्ता व रस्त्यावरील पदपथ दोन्ही बाजूने हातगाडी, टप-या, खाऊच्या गाडया यांनी व्यापून गेला आहे. रस्त्यावरील पदपथावर प्रभागातील नागरीक, महिला, वयोवृध्द मुले यांना चालणेही शक्य नाही. तरी सदर संपूर्ण रस्ता नो हॉकर्स झोन करणेबाबतचा प्रस्ताव

**विषय क्र.** ४ : प्रभाग क्र. २५ येथे निविदा क्र. ३/२/२०१७-१८ या चालू असलेल्या कामातुन संपूर्ण ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये अतिक्रमण कारवाई करणेकामी मशिनरी वापरणेबाबतचे प्रस्ताव

**तदनंतर मा. ड प्रभाग समिती माहे  जानेवारी २०१८ चे नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.**

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव : माहे फेब्रुवारी २०१८ च्या नियमित सभेचे कार्यपत्रिका क्र. ७ वरील विषयास मंजुरी मिळावी.**

**मा. सभापती** :- माहे फेब्रुवारी २०१८ चे नियमित सभेचे कार्यपत्रिका क्र. ७ वरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत येत आहे.

**मा. प्रशासन अधिकारी तथा सचिव** : मागील सभा माहे डिसेंबर  २०१७ ची कार्यपत्रिका क्र.५ व माहे जानेवारी २०१८ ची कार्यपत्रिका क्र. ६ च्या प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती** : : मागील सभा माहे डिसेंबर  २०१७ ची कार्यपत्रिका क्र.५ व माहे जानेवारी २०१८ ची कार्यपत्रिका क्र. ६ च्या प्रभाग समिती सभेचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर कार्यपत्रिकेवरील विषयांवर खालीलप्रमाणे मंजुरी देणेत आली.

विषय क्र. १ ठराव क्र. १३

दिनांक :  ०२/०२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक:  मा.श्रीमती चंदा राजू लोखंडे अनुमोदक :मा. श्रीमती उषा अंकुश मुंढे

संदर्भ:मा.श्रीमती चंदा राजू लोखंडे यांचेकडील दि.०६/१२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २९ येथील वैदूवस्तीमध्ये दोन्ही बाजूस असलेले सार्वजनिक शौचालय बंद करावे कारण महाराष्ट्र शासनाच्या वतीने हगणदारी मुक्त योजनेंतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या आरोग्य खात्यामार्फत वैयक्तिक शौचालय बांधून दिलेले आहे व काहींना अनुदान दिलेले आहे. तरी वैदूवस्तीमध्ये  दोन्ही बाजूस असलेले सार्वजनिक शौचालय बंद करणेबाबतचा मागील ड प्रभाग समिती सभा माहे जानेवारी २०१८ मध्ये केलेल्या  तहकुब प्रस्तावावर  सहा. आरोग्याधिकारी यांचेकडून दि. ३०/०१/२०१८  अन्वये अहवाल प्राप्त झाला असुन सदर अहवालानुसार सद्यस्थितीत २५० नागरीक सदर शौचालयाचा वापर करीत असल्याने एक सहा सीटस (महिलांसाठी-३) व (पुरुषांसाठी-३)  व दुस-या ठिकाणी सहा सीटस (महिलांसाठी-३) व (पुरुषांसाठी-३)असे एकूण १२ सीटस असलेल्या शौचालयाची आवश्यकता असल्याने सदर ठिकाणचे  दोन्हीही सार्वजनिक शौचालय जुने व जीर्ण झालेले असल्यामुळे दोन्हीही ठिकाणचे शौचालय पाडावे व दोन्हीही ठिकाणी नव्याने सहा सिटस शौचालयाचे बांधकाम करावे. प्रत्येक ठिकाणी महिलांसाठी तीन सीटस व पुरुषांसाठी तीन सीटस याप्रमाणे  मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

-----------------

विषय क्र. २ ठराव क्र. १४

दिनांक : ०२/०२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री.विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे अनुमोदक:मा.सौ. शितल विठ्ठल उर्फ नाना काटे

संदर्भ : मा.श्री.विठ्ठल उर्फ नाना कृष्णाजी काटे यांचा दिनांक ०५/०१/२०१८ रोजीचा प्रस्ताव

पिंपळे सौदागर येथील रोझलँड रेसिडेन्सी शेजारील स.नं. १३०, १३२,१३३,१३४ पैकी महापालिकेचे उद्यान आरक्षण क्र. ३७१ ब प्रमाणे उद्यान विकसित करण्यात येत आहे. या उद्यानाला शोभेल असे “राजमाता जिजाऊ उद्यान” नामकरण करणेच्या माहे जानेवारी २०१८ च्या ड प्रभाग समितीमध्ये तहकुब करण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा झाली. त्यात मा. श्री. बापू उर्फ शत्रुघ्न काटे यांनी सदर नावास विरोध नाही परंतु उद्यानाची ७० ते ८० टक्के जागा ताब्यात आल्याशिवाय नामकरणाची कार्यवाही करु नये असे सुचविले. मा. सभापती यांनी सदर उद्यानाचे नामकरण करणेकामी संपूर्ण जागा ताब्यात येत नाही तोपर्यंत सदरचा विषय तहकुब ठेवणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. ३ ठराव क्र. १५

दिनांक : ०२/०२/२०१८ विभाग : नगररचना विभाग

सूचक: मा.श्री. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ:मा. श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०२/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ८३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून दक्षिण बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्टयातुन १२.० मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ८३,८८ व १३९ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेबाबतचा विषय तहकुब ठेवणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

--------------

विषय क्र. ४ ठराव क्र. १६

दिनांक : ०२/०२/२०१८ विभाग : नगररचना विभाग

सूचक: मा.श्री. संदीप अरुण कस्पटे अनुमोदक :मा. श्रीमती आरती सुरेश चोंधे

संदर्भ:मा. श्री. संदीप अरुण कस्पटे यांचेकडील दि.०२/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

मौजे वाकड येथील सर्व्हे नं. ७३ मधील मंजूर विकास योजनेतील भुमकर चौक ते हिंजवडी या ३०.० मीटर रुंद रस्त्यापासून उत्तर बाजूकडील असणा-या नाल्याशेजारील हरित पट्टयातुन १२.०

मीटर रुंद रस्ता सर्व्हे नं. ७३व ७२ मधुन १८ मीटर रुंद रस्त्यापर्यंत करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम २०५ अन्वये घोषित करणेचा विषय तहकुब ठेवणेच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

विषय क्र. ५ ठराव क्र. १७

दिनांक : ०२/०२/२०१८ विभाग : भूमि व जिंदगी विभाग

सूचक: मा.श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे अनुमोदक :मा. श्रीमती निर्मला संजय कुटे

संदर्भ : मा.श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे यांचेकडील दि.०२/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथे कुणाल आयकॉन रस्ता व रस्त्यावरील पदपथ दोन्ही बाजूने हातगाडी, टप-या, खाऊच्या गाडया यांनी व्यापून गेला आहे. रस्त्यावरील पदपथावर प्रभागातील नागरीक, महिला, वयोवृध्द मुले यांना चालणेही शक्य नाही. तरी सदर संपूर्ण रस्ता नो हॉकर्स झोन करणेबाबतचा प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

------------------

विषय क्र. ६ ठराव क्र. १८

दिनांक : ०२/०२/२०१८ विभाग : स्थापत्य विभाग

सूचक: मा.श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे अनुमोदक :मा. श्रीमती निर्मला संजय कुटे

संदर्भ : मा.श्री. बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे यांचेकडील दि.०२/०२/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्र. २५ येथे निविदा क्र. ३/२/२०१७-१८ या चालू असलेल्या कामातुन संपूर्ण ड क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामध्ये अतिक्रमण कारवाई करणेकामी मशिनरी वापरणेबाबत सदर सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठरावावर अंमलबजावणी करणेचे प्रस्तावावर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

-----------------

मा. सभापती - मा. क्षेत्रीय अधिकारी श्रीमती झगडे हया ड क्षेत्रीय कार्यालयात रूजू झाल्या असुन त्यांचे सहकार्याने क्षेत्रीय कार्यालयाचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यास मदत होईल. मागील ७ ते ८ प्रभाग समिती सभांमध्ये पाणी, कचरा व अतिक्रमण विषयक तक्रारी आलेल्या आहेत. नियोजनास अनुसरुन विषय येणे आवश्यक होते. नागरीकांकडून प्राप्त होणा-या तक्रारीच नगरसदस्य अधिका-यांपर्यंत पोहोचवत असतात. त्यामुळे अतिक्रमण विभागाकडील कारवाई कडक पध्दतीने होणेबाबत अधिका-यांना सूचना देणेत येत आहेत तसेच या कामी येणा-या अडचणींचे निराकरण करण्यासाठी सर्व सदस्यांचे सहकार्य मिळेल. तरी सर्व विभागांनी त्यांना नेमून दिलेली कामे

व्यवस्थितपणे पूर्ण करावी असे सांगुन सर्व उपस्थितांचे आभार मानुन माहे फेब्रुवारी २०१८ ची ड प्रभाग समिती सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(कदम शशिकांत गणपत)
**सभापती,**
ड प्रभाग समिती,
ड क्षेत्रीय कार्यालय, रहाटणी – १७

सही/-
(सीताराम बहुरे)
**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
ड प्रभाग समिती

क्रमांक – ड/१३/कावि/७४ /२०१८
दिनांक – १५ /०२/२०१८